महानदी पाणी तंटा लवादाच्या कामकाजात भाग घेण्यासाठी शासनाच्या वतीने श्री. श्री.ना.हुद्दार, निवृत्त सचिव यांची तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्ती करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्रमांक : महानदी २०१८/प्र.क्र.९५/२०१८/जसंनि

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक- १६ सप्टेंबर, २०१९

वाचा : क्रमांक महानदी २०१८/प्र.क्र.९५/२०१८/जसंनि दि. ०१/०१/२०१९ चे पत्र.

१. प्रस्तावना :-

मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २३/१/२०१८ आदेशात महानदी पाणी तंटा लवाद स्थापन करावयाचे आदेश दिले आहेत. त्यानुसार जलसंसाधन, नदी विकास आणि गंगा संरक्षण मंत्रालय, यांच्या दिनांक १२ मार्च, २०१८ च्या अधिसूचनेव्दारे “महानदी पाणी तंटा लवाद” गठीत करण्यात आला आहे.

महानदी पाणी तंटा लवादा समोर महाराष्ट्र राज्याची बाजू मांडण्याच्या दृष्टीने लवादाच्या कामकाजाच्या कायदेविषयक बाबी लक्षात घेऊन तांत्रिक सल्ला देण्यासाठी आंतरराज्यीय पाणी तंटा लवादांबाबतचा प्रदीर्घ अनुभव, Hydrology विषयातील श्री. श्री.ना.हुद्दार यांचे ज्ञान विचारात घेता त्यांची तांत्रिक सल्लागार (Technical Adviser) म्हणून दि. ०१/०१/२०१९ च्या पत्रान्वये नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुषंगाने त्यांना द्यावयाच्या मानधन, प्रवास भत्ता व इतर खर्च तसेच अटी व शर्ती इ. बाबी शासनाच्या विचाराधीन होत्या.

२. शासन निर्णय :-

२.१. महानदी पाणी तंटा लवादा समोर महाराष्ट्र राज्याची बाजू मांडण्याच्या दृष्टीने लवादाच्या कामकाजाच्या कायदेविषयक बाबी लक्षात घेऊन तांत्रिक सल्ला देण्यासाठी श्री. श्री.ना.हुद्दार यांचे ज्ञान विचारात घेता त्यांची तांत्रिक सल्लागार (Technical Adviser) म्हणून शासनाच्या दि. ०१/०१/२०१९ च्या पत्रान्वये नियुक्ती करण्यात आली आहे. श्री. श्री. ना. हुद्दार यांना महाराष्ट्र शासनास सल्ला देण्यासाठी दिल्ली येथील कामाकरिता प्रतीदिन रु. १०,०००/- (रु. दहा हजार मात्र) इतके मानधन तसेच मुंबई, ओरिसा व महाराष्ट्रातील अन्य ठिकाणच्या कामाकरिता प्रतिदिन रुपये ८,०००/- (रु. आठ हजार मात्र) इतके मानधन अनुज्ञेय राहील. शासनास सल्ला देण्याच्या कामाच्या अनुंषगाने दुरध्वनी, फॅक्स, झेरॉक्स व टंकलेखन यासाठी सल्लागार यांनी केलेला खर्च मानधनात समाविष्ट राहिल. प्रत्येक महिन्याचे कामाचे दिवस व केलेल्या कामाबाबतची सविस्तर टिप्पणी दर महिन्यास शासनास सादर करणे आवश्यक राहील.

२.२. प्रवासाच्या दिवसासाठी व सल्ल्यानिमित्त मुख्यालयाबाहेरील मुक्कामातील बिगर कामाच्या दिवसासाठी प्रतिदिन रु. २,८००/- (रु. दोन हजार आठशे मात्र) इतके मानधन अनुज्ञेय राहील.

२.३. सल्लागारांना शासन निर्देश देईल त्या-त्या वेळेस लवादाशी निगडित कामासाठी उपस्थित रहावे लागेल. कामाच्या दिवसांच्या मानधन अनुज्ञेय असलेल्या दिवसांची प्रत्येक वर्षातील कमाल मर्यादा १२० दिवस इतकी राहील.

२.४. श्री. श्री. ना.हुद्दार, निवृत्त सचिव यांचे मुख्यालय नागपूर हे राहील व दिल्ली, मुंबई, ओरिसा आणि इतर ठिकाणी आवश्यकतेनुसार त्यांना लवादाच्या कामासाठी उपस्थित रहावे लागेल. हॉटेलमधील निवासाचा प्रत्यक्षात केलेला खर्च (Boarding charges) मानधनात अंतर्भूत आहे.

२.५. जेथे विमान सेवा उपलब्ध असेल तेथे सल्लागारांना इकॉनामी क्लासने विमान प्रवास अनुज्ञेय राहील. त्यासाठी पूर्व अनुमतीची आवश्यकता भासणार नाही. रेल्वेच्या प्रवासासाठी वातानुकुलित प्रथम वर्ग अनुज्ञेय राहील. कामकाजाच्या ठिकाणी, विमानतळ किंवा रेल्वे स्टेशनवर येताना व जाताना कार अथवा भाड्याची वातानुकूलित कार अनुज्ञेय राहील.

३. सदरचे न्यायालयीन प्रकरण हे विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांच्याशी संबंधित असल्याने सदर प्रकरणी कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांना प्राधिकृत केले आहे. त्यानुसार श्री. श्री.ना. हुद्दार, निवृत्त सचिव यांचे मानधनासाठी येणारा खर्च हा विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या मंजूर अनुदानातुन भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेताक २०१९०९१६१६३८३८६३२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Rajnish Ramkishor Shukla

Digitally signed by Rajnish Ramkishor Shukla
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d37cbfb080a0bc996a710b3c0aeea737985dac09cb66bbff878f42ad4e77a606, cn=Rajnish Ramkishor Shukla
Date: 2019.09.16 16:46:09 +05'30'

(र. रा. शुक्ला)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२.
२. मा.मंत्री, जलसंपदा यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई - ३२.
३. मा.राज्यमंत्री जलसंपदा यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई - ३२.
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई - ३२.

५. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
६. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
७. प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
८. सचिव, (लाक्षेवि) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
९. सचिव, (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
१०.कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ , नागपूर.
११.महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र २ / १ - मुंबई, नागपूर,
१२.महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र २ / १ - मुंबई, नागपूर,
१३.मुख्य अभियंता, (कृपातंल) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ .
१४.सहसचिव (सेवा) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
१५.आंतरवित्त सल्लागार व सहसचिव जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
१६.मुख्य अभियंता, (जसं) व सहसचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
१८. श्री. श्री. ना. हुद्दार, ३ ब १/७, न्यु अंजठा एव्हेनु, पौड रोड, कृष्णा हॉस्पीटल जवळ, कोथरूड, पुणे ४११ ०३८.
१९.कोषागार अधिकारी, पुणे.
२०.जसंनि कार्यासन संग्रहार्थ.